दिनांक ०७/०९/२०२१

# राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेकरिता ई-निविदा

MCAER

कृषि परिषद

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, (कृषी परिषद),
पुणे करिता

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२६२१/१७१८ दि.०६ सप्टेंबर,२०२१

## ई-निविदा सूचना

राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेकरिता महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेकडून https://maharashtra.nextprocure.in या संकेतस्थळाद्वारे प्रतिष्ठीत संस्थांकडून खाली नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियाविषयक ई-निविदेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | निविदेचा तपशील | सुरुवात दिनांक | शेवट दिनांक | लिफाफा |
|---|---|---|---|---|
| १. | निविदा प्रसिध्दी | दि.०७/०९/२०२१ ११.०० वाजता | दि.०७/०९/२०२१ १३.०० वाजता | |
| २. | ई-निविदेची सुरुवात (डाऊनलोड व तयारी) | दि.०७/०९/२०२१ १३.०० वाजता | दि.१७/०९/२०२१ १७.०० वाजता | लिफाफा १ व लिफाफा २ |
| ३. | कृषी परिषद, पुणे येथे प्री बीड ऑनलाईन बैठक (Link- https://meet.google.com/err-bomx-gpq) | दि.०९/०९/२०२० ११.०० वाजता | | -- |
| ४. | बीड दाखल करणे | दि.०७/०९/२०२१, १३.०१ वाजता | १७/०९/२०२१, १७.०० वाजता | |
| ५. | तांत्रिक व आर्थिक बीड उघडणे | दि.२०/०९/२०२१ १०.०० वाजता | दि.२०/०९/२०२१ १७.०० वाजता | लिफाफा १ लिफाफा २ |
| ६. | निविदा शुल्क | रू.५०००/- (ना परतावा) | | |
| ७. | बयाणा रक्कम | रू.५०,०००/- केवळ | | |
| ८. | निविदेचे अंदाजित मूल्य | रू.१५.०० लाख फक्त | | |
| ९. | सुरक्षा ठेव | निविदा मूल्याच्या १० टक्के | | |
| १०. | पत्रव्यवहाराचा पत्ता | संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे- ४११००७. | | |

अध्यक्ष,
निविदा समिती तथा संचालक (शिक्षण),
कृषी परिषद, पुणे

Scanned by CamScanner

## महत्वाच्या सूचना

१. कृषी परिषदेच्या www.mcaer.org किंवा राज्य पब्लिक प्रोक्युरमेंट पोर्टल च्या **https://maharashtra.nextprocure.in** हया संकेतस्थळांवरून निविदेची कागदपत्रे प्राप्त करावीत. याकरिता सेंट्रल पब्लिक प्रोक्युरमेंट पोर्टलच्या संकेतस्थळावर प्रथमतः नोंदणी करावी. निविदा ऑनलाईन पध्दतीने दाखल करण्याकरिता निविदाधारकाकडे वैध डीजीटल स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

२. ई-निविदा केवळ **https://maharashtra.nextprocure.in** या पोर्टलवरच स्वीकारल्या जातील.

३. काही / सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकृत / रद्दबातल करण्याचे अधिकार महासंचालक, कृषी परिषद, पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

४. ई-निविदा पोर्टलवर नोंदणी करण्यास, ई-निविदा दाखल / अपलोड करण्यास निविदाधारकाला उशीर झाल्यास कृषी परिषद जबाबदार राहणार नाही. करिता निविदाधारकांना सूचित करण्यात येते की, **https://maharashtra.nextprocure.in** या संकेतस्थळावर निविदेकरिता नोंदणी करून डीजीटल स्वाक्षरीची सुध्दा नोंदणी करावी आणि त्यांचे दरपत्रक वेळेपूर्वी पोर्टलवर अपलोड करावे.

५. या निविदेसंदर्भात कोणतेही बदल / शुध्दीपत्रक असल्यास ते राज्य पब्लिक प्रोक्युरमेंट पोर्टलच्या https://maharashtra.nextprocure.in या संकेतस्थळामार्फत निर्गमित करण्यात येईल. करिता निविदाधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी अद्ययावत माहितीकरिता www.mcaer.org / https://maharashtra.nextprocure.in या संकेतस्थळांना वेळोवेळी भेट द्यावी.

६. **निविदा शुल्क :-** निविदाधारकांनी ना परतावा निविदा शुल्क रू.५०००/- ऑनलाईन पेमेंट गेटवे मार्फतच भरावे. (ICICI Bank A/C No. 042405002491, IFSC Code ICIC0000424, Branch- Pune Senapati Bapat Road) MSME, NSIC च्या प्रमाणपत्रधारकांना सुध्दा निविदा शुल्क भरणे अनिवार्य असेल.

७. **बयाणा रक्कम ठेव (EMD):-** निविदाधारकांने बयाणा रक्कम ठेव म्हणून रू.५०,०००/- ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे भरणा करणे आवश्यक आहे. (ICICI Bank A/C No. 042405002491, IFSC Code ICIC0000424, Branch- Pune Senapati Bapat Road)

MSME च्या प्रमाणपत्रधारकांना बयाणा रक्कम भरण्यापासून सूट आहे..

८. कोणतेही कारण न देता, कृषी परिषद, प्रवेश प्रक्रियेतून कोणताही अभ्यासक्रम वगळेल किंवा रद्द करेल.

**टिपः-** पूर्ण झालेला अर्ज (प्रतिसाद दस्तऐवज), (मुद्रित, स्वाक्षरी आणि बाँडची प्रत) सिलबंद लिफाफ्यामध्ये सिलबंद करून लिफाफ्यावर "महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांतर्गत कृषी अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी निविदा" असे लिहून सदर लिफाफा, "संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११ ००७" या पत्त्यावर पाठवावा.

Scanned by CamScanner

## प्रास्ताविक :

**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (कृषी परिषद)** ही महाराष्ट्र कृषी विद्यापीठे, **अधिनियम, १९८३ चे कलम १२** अंतर्गत स्थापन झालेली **वैधानिक संस्था** आहे. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणण्याचे कार्य कृषी परिषदेमार्फत करण्यात येते. सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून कृषी परिषद चारही कृषी विद्यापीठातील पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविते.

## ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पोर्टलवर करावयाची कामे-

### १. ऑनलाईन प्रवेश अर्ज विकसित करणे-

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर आणि आचार्य पदवी प्रवेशाची प्रक्रिया, मागील शैक्षणिक वर्षाच्या (२०२०-२१) प्रवेश माहिती पुस्तिकेच्या धर्तीवर तसेच दरवर्षी होणारे बदल विचारात घेऊन वेळोवेळी ऑनलाईन प्रवेश अर्ज विकसित करणे व त्यानुसार वेळोवेळी प्रवेश कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करणे.

### २. कागदपत्रांची ऑनलाईन पध्दतीने छाननी-

प्रवेश अर्जासोबत प्राप्त झालेली माहिती व कागदपत्रे यांची प्रशिक्षत, अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तींकडून पडताळणी करून तात्पुरती गुणवत्ता यादी, रद्दबातल अर्जांची कारणासह यादी, विद्यार्थ्याने प्रवेश अर्जाद्वारे दावा केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास अशा त्रुटींची यादी प्रसिध्द करणे. तसेच सदर काम करणाऱ्या व्यक्तींची यादी संचालक (शिक्षण) यांना अवलोकनार्थ सादर करणे.

### ३. त्रुटींची माहिती देणे-

वरील प्रमाणे प्रवेश अर्जातील दर्शविलेल्या त्रुटी, प्रवेश अर्ज रद्दबातलसंदर्भात विद्यार्थ्यांना पूर्तता करण्यासाठी संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देणे.

### ४. गुणवत्ता यादीची प्रसिध्दी-

विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या त्रुटींच्या पूर्ततेविषयक कागदपत्रांची तपासणी करणे व योग्य असल्यास त्यांना ग्राह्य धरणे आणि विद्यापीठस्तरीय व राज्यस्तरीय अंतिम गुणवत्ता याद्या प्रसिध्द करणे.

Scanned by CamScanner

५. **प्रवेश वाटप फेऱ्या-**

प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रवेश वाटपाच्या नियमानुसार / शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / परिपत्रकानुसार अंतिम गुणवत्ता यादीच्या आधारे प्रवेश वाटप फेऱ्या राबविणे व उपलब्ध जागांची स्थिती गतिकरीत्या (dynamically) दर्शविणे.

६. प्रवेश वाटप फेऱ्यांची संख्या व कालावधी कृषी परिषद कार्यालयाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल / वाढविण्यात येतील. कृषी परिषद कार्यालयाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार याद्या प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

७. ऑनलाईन प्रवेश फेऱ्यानंतर उर्वरित जागा भरण्याकरिता प्रवेश प्रक्रिया केंद्रांवर प्रवेश फेरी राबविण्याकरिता प्रवेश प्रक्रिया केंद्रांना लॉग-इन देणे, प्रवेशित उमेदवार वगळून उर्वरित उमेदवारांच्या गुणवत्ता याद्या पुरविणे व प्रवेश प्रक्रिया केंद्रांवर राबविण्यात येणाऱ्या प्रवेश वाटप फेरीचे नियंत्रण करणे, रिक्त जागांची स्थिती संकेतस्थळावर गतिकरीत्या (dynamically) दर्शविणे.

८. प्रत्येक प्रवेश वाटप फेरी प्रसिध्द करतांना त्याचवेळी महाविद्यालयनिहाय व प्रवर्गनिहाय शेवटच्या विद्यार्थ्यांची टक्केवारी (cutoff) विषयक माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणे.

९. प्रवेश अर्जाकरिता उमेदवारांना तसेच प्रत्येक महाविद्यालय, कृषी विद्यापीठ आणि कृषी परिषद यांना स्वतंत्र लॉग-इनची सुविधा उपलब्ध करणे.

१०.उमेदवाराच्या लॉग-इनमध्ये उमेदवाराची वैय्यक्तिक, शैक्षणिक माहिती, प्रवेश अर्ज शुल्क भरण्याची सुविधा, कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा (किमान ६०० केबी क्षमता प्रती कागदपत्र), त्रुटींच्या पूर्ततेसाठी सुविधा, प्रवेश वाटप झाल्यास छायाचित्र असलेले प्रवेश वाटप पत्र, प्रवेश नाकारण्याची सुविधा इत्यादी बाबी तसेच कृषी परिषदेकडून वेळोवेळी सूचित केलेल्या बाबींचा समावेश उमेदवाराच्या लॉग-इन मध्ये करणे.

११.विद्यार्थ्यास प्रवेश प्रक्रियेंतर्गत विविध माहिती देण्यासाठी भ्रमणध्वनी संदेशाची सुविधा करणे.

१२.महाविद्यालयाच्या लॉग-इनमध्ये प्रवेश वाटप फेऱ्यानिहाय प्रवेशित उमेदवारांचे प्रवेश अर्ज (अपलोड केलेल्या कागदपत्रांसह), प्रवेशित उमेदवारांची यादी, प्रवेश वाटप पत्रे, उमेदवाराचा प्रवेश निश्चित करणे, रद्दबातल करणे, नाकारणे इत्यादीची कारणासह सुविधा उपलब्ध करणे.

१३.कृषी विद्यापीठाच्या लॉगइनमध्ये कृषी विद्यापीठांतर्गत असणाऱ्या महाविद्यालयांतील प्रवेशित उमेदवारांच्या याद्या, महाविद्यालयनिहाय प्रवेशित, रद्दबातल, नाकारलेल्या उमेदवारांची, प्रवर्गनिहाय / प्रवेश वाटप फेरीनिहाय / एकत्रित सांख्यिकी माहिती उपलब्ध करणे.

Scanned by CamScanner

१४.कृषी परिषदेच्या लॉगइनमध्ये चारही कृषी विद्यापीठांतर्गत असणाऱ्या महाविद्यालयांतील प्रवेशित उमेदवारांच्या याद्या, महाविद्यालयनिहाय प्रवेशित, रद्दबातल, नाकारलेल्या उमेदवारांची, प्रवर्गनिहाय / प्रवेश वाटप फेरीनिहाय / एकत्रित सांख्यिकी माहिती वेळोवेळी कृषी परिषद कार्यालयास उपलब्ध करणे.

१५.याव्यतिरिक्त गरजेनुसार वेळोवेळी कृषी परिषदेकडून सूचित केलेल्या सुधारणा लॉग-इनमध्ये करणे.

१६.ऑनलाईनद्वारे विद्यार्थ्यांकडून जमा होणारे प्रवेश अर्ज शुल्क थेट कृषी परिषदेच्या खात्यामध्ये जमा करणे. (महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या नावे स्टेट बँक ऑफ इंडिया, विद्यापीठ रस्ता शाखा (पुणे), शाखा कोड क्र. 07339 IFSC Code No. SBIN0007339 येथील खाते क्र. १०१९८६६३७८४)

१७.प्रवेश प्रक्रियेसंदर्भात उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या सर्व अर्जातील माहिती, प्रवेशित उमेदवारांची प्रवर्ग, प्रवेशित प्रवर्ग, गुण इत्यादी माहिती, प्रवेश वाटप पत्रे इत्यादी विविध माहिती, सांख्यिकी माहिती, याचबरोबर कृषी परिषदेने वेळोवेळी मागविलेली वेगवेगळया प्रपत्रातील माहितीची सॉफ्ट कॉपी कृषी परिषद कार्यालयास वेळेत सादर करणे व याबाबत गोपनीयता राखणे.

१८.वरील सर्व ऑनलाईन कामे निविदाधारकाच्या संकेतस्थळावर करणे. त्यासाठी कृषी परिषदेचे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

१९.प्रत्येक महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या जागांचा कोटानिहाय, प्रवर्गनिहाय आणि विषयनिहाय तपशील (पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमासंदर्भात बिंदुनामावलीसुध्दा) कृषी परिषद कार्यालयाकडून पुरविण्यात येईल.

२०.प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये (अर्ज भरण्यास सुरुवात झाल्यापासून अंतिम प्रवेश होईपर्यंत) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसंदर्भात उमेदवारांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी कृषी परिषद कार्यालयात एका कर्मचाऱ्याच्या पूर्णवेळ सेवा उपलब्ध करून देणे.

२१.ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसंदर्भात उमेदवारांचे दूरध्वनी स्वीकारून शंकांचे निरसन करण्यासाठी दूरध्वनीच्या पाच लाईन असलेल्या कॉल सेंटरची सुविधा करणे.

२२.प्रवेशविषयक संपूर्ण माहिती कृषी परिषदेच्या मालकीची राहील. कृषी परिषदेची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय सदर माहितीचा निविदाधारकांना इतर कोणत्याही कारणासाठी उपयोग करता येणार नाही. असा उपयोग केल्यास नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्याचे अधिकार कृषी परिषदेचे असतील.

२३.संकेतस्थळावरील महिती आकर्षक , मुद्देसूद, वापरकर्त्यास अनुकूल असावी.

Scanned by CamScanner

२४.कार्यादेश दिल्यानंतर २० दिवसांच्या कालावधीत सॉफ्टवेअर कार्यान्वित होणे आवश्यक राहील.

२५.सॉफ्टवेअरचे सर्व बौध्दिक संपत्ती अधिकार कृषी परिषदेचे राहतील.

२६.निवड केलेल्या संस्थेसोबत पुढील दोन वर्ष काम करण्याचा सामंजस्य करार करण्यात येईल. परंतु संस्थेचे काम असमाधानकारक असल्यास सदर सामंजस्य करार कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल. तसेच संस्थेचे काम समाधानकारक असल्यास सदरचा सामंजस्य करार कृषी परिषदेच्या मान्यतेने पुढील तीन वर्षापर्यंत वाढविता येईल.

२७.निविदाधारकाने प्रवेश प्रक्रियेच्या सर्व कामकाजासाठी स्वतंत्र संपर्क अधिकारी नियुक्त करणे बंधनकारक राहील.

२८.पुढील प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियांची संख्या कमी किंवा निश्चित करण्याचे अधिकार कृषी परिषद राखून ठेवीत आहे.

२९.मराठी भाषेतील ई-निविदा कागदपत्रांबरोबरच इंग्रजी भाषेतील ई-निविदाविषयक कागदपत्रांचे काळजीपूर्वक वाचन करूनच ई-निविदा दाखल करावी.

**निविदा –**

संकेतस्थळ विकसित करून प्रतिष्ठीत शैक्षणिक संस्थेसाठी काम करण्याचा अनुभव असलेल्या बोनाफाईड संस्थेकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेच्या अटी व शर्ती https://maharashtra.nextprocure.in या संकेस्थळावरून प्राप्त कराव्यात.

**निविदेचे स्पष्टीकरण (प्रीबीड बैठक)-**

निविदाधारकास निविदेबाबत काही शंका असल्यास निविदाधारकाने प्रीबीड बैठकीमध्ये अशा शंकांबाबत स्पष्टीकरण देण्यात येईल.

प्रवेश प्रक्रियेंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रवेश अर्जांची अंदाजित संख्या-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | अंदाजित प्रवेश अर्जांची संख्या |
|---|---|---|
| ३. | पदव्युत्तर पदव्या | ३६५० |
| ४. | आचार्य पदवी | ४०० |

**टिपः-** कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांना कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश देण्याची प्रक्रिया राबविण्याबाबत निर्णय झाल्यास सदर प्रवेश प्रक्रिया पदव्युत्तर व आचार्य पदवी प्रवेशासाठी दिलेल्या दरातच ऑनलाईन पध्दतीने राबवावी लागेल. अशा प्रवेश अर्जांची अंदाजित संख्या ३००० असेल.

Scanned by CamScanner

**लिफाफा क्र. १ (तांत्रिक प्रस्ताव)**

तांत्रिक प्रस्तावामध्ये निविदेचे तांत्रिक वैशिष्टय, निविदा अंमलबजावणीचे नियोजन, अंमलबजावणीनंतरची हमी आणि तांत्रिक बीड दस्ताऐवजासाठी चेकलिस्टसह नोंदणी प्रमाणपत्रे (उदा. पॅनकार्ड, जीएसटी प्रमाणपत्र इत्यादी) निविदाधारकाची प्रोफाईल याव्यतिरिक्त प्रस्तावित केलेल्या नियम व अटीविषयक निविदाधारकास आवश्यक वाटणारी कागदपत्रे दाखल करणे आवश्यक आहे.

**बोली पूर्वीची पात्रता-**

| अ. क्र. | निकष | ग्राह्य समर्थनीय दस्तावेज / तांत्रिक प्रस्तावासह निकषाच्या ग्राह्यनुसार दाखल करावयाची माहिती |
|---|---|---|
| १. | निविदाधारक, ही मागील पाच वर्षापासून आवश्यक त्या कायद्यांतर्गत भारतामध्ये नोंदणी केलेली माहिती तंत्रज्ञान सेवा आधारीत कंपनी / संस्था / फर्म असावी. | निगमाचे प्रमाणपत्र / नोंदणी प्रमाणपत्र / शॉप ॲक्ट प्रमाणपत्र |
| | | जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र / जीएसटीआयएन. |
| | | प्रोप्रायटर / संस्थेच्या नाव असलेले पॅन कार्ड |
| २. | माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानाच्या सेवा किंवा व्यवसायापासून निविदाधारकाची मागील तीन आर्थिक वर्षातील वार्षिक उलाढाल किमान रू.२५.०० लाख (अक्षरी रूपये पंचवीस लाख फक्त) असावी. | नोंदणी क्रमांकासह लेखा परीक्षक प्रमाणपत्र (सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले) / शिक्का / मागील तीन आर्थिक वर्षातील (म्हणजेच २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१) वार्षिक उलाढाल दर्शविणारे दस्तऐवज |
| ३. | मागील पाच वर्षे कालावधीतील म्हणजेच सन २०१६-१७ हया शैक्षणिक वर्षापासून आजपावेतो हया कालावधीत निविदाधारकाकडे किमान २०,००० विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया हाताळण्याचा किमान एका प्रकल्पाचा अनुभव असावा. | (१) ज्या संस्थेकडे काम केलेले आहे, त्या संस्थेने दिलेले प्रकल्प अनुभव प्रमाणपत्र. |
| | | (२) हाताळलेल्या प्रकल्पाचे कार्यादेश. (स्वतः च्या स्वाक्षरीचे प्रकल्प अनुभव प्रमाणपत्र विचारात घेण्यात येणार नाही.) |
| ४. | मागील पाच वर्षे कालावधीतील म्हणजेच सन २०१६-१७ हया शैक्षणिक वर्षापासून आजपावेतो हया कालावधीत राज्य / केंद्र / शासकीय / केंद्र शासित प्रदेश / निमशासकीय / भारतातील पीएसयू च्या काळ्या यादीत निविदाधारकास कोणत्याहीवेळी नसावा. | काळ्या यादीमध्ये नसल्याबाबत चे घोषणापत्र जोडावे. |

Scanned by CamScanner

| अ. क्र. | निकष | ग्राह्य समर्थनीय दस्तावेज / तांत्रिक प्रस्तावासह निकषाच्या ग्राह्यनुसार दाखल करावयाची माहिती |
|---|---|---|
| ५. | निविदाधारकाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेशी संबंधित कागदपत्रांची ऑनलाईन छाननी करण्याची क्षमता असावी. | |

**लिफाफा क्र. २ (आर्थिक प्रस्ताव)**

वित्तीय प्रस्तावामध्ये प्रत्येक मॉडयुल्स आणि त्याच्या अंमलबजावणीची किंमत सोबत परिशिष्ट-१ मधील प्रपत्रामध्येच द्यावे. तसेच त्यासोबत दर विश्लेषण देण्यात यावे.

निविदाधारकाकडून या निविदेच्या प्रतिसादाकरिता, करार करण्यासह वार्तालापाशी किंवा निविदा सादर करण्याकरिता लागणाऱ्या कोणत्याही खर्चासाठी कृषी परिषद जबाबदार राहणार नाही.

अध्यक्ष,
निविदा समिती तथा संचालक (शिक्षण),
कृषी परिषद, पुणे

Scanned by CamScanner

## परिशिष्ट -१

### आर्थिक बीड प्रपत्र

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | दर प्रती उमेदवार |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे / महाविद्यालयांचे विकल्प भरण्यासह कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा / निविदेमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेस अनुसरून गुणवत्ता यादी तयार करणे | |
| २. | कागदपत्रांची ऑनलाईन पध्दतीने छाननी करणे | |
| ३. | प्रवेश वाटप फेऱ्यांच्या वेळी / अतिरिक्त प्रवेश वाटप फेऱ्यांच्यावेळी महाविद्यालयांचे विकल्प भरण्याची सुविधा | |
| ४. | *प्रती प्रवेश वाटप फेरी | |

* प्रवेश वाटप फेरीसाठी ज्या प्रवेश अर्जांवर प्रक्रिया केली असेल, अशा प्रवेश अर्जांची संख्या विचारात घेऊन रक्कम निश्चित करण्यात येईल. मात्र जागेवरील प्रवेश फेरीच्या बाबतीत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार रक्कम निश्चित करण्यात येईल.

टिपः- १. नमूद केलेल्या दरामध्ये जीएसटी आकार समाविष्ट असावेत.
२. वरील चारही बाबींची जीएसटी आकारासहित एकत्रित रक्कम विचारात घेऊन न्युनतम दर दर्शविणाऱ्या संस्थेची ई-निविदा मंजूर करण्यात येईल.

---

ई-निविदेविषयक वरील मसुदा मंजूर करण्यात येत आहे.

(अस्मिता बाजी)
सदस्य तथा
वित्तीय सल्लागार

(एन.बी. गोखले)
सदस्य तथा
सहसंचालक (प्रशासन)

(विठ्ठल शिर्के)
सदस्य तथा
संचालक (वि.शि. व सासावि)

(किशोर शिंदे)
सदस्य सचिव तथा सहयोगी प्राध्यापक,

(हरिहर कौसडीकर)
अध्यक्ष तथा संचालक (शिक्षण)

(विश्वजीत माने)
महासंचालक, कृषी परिषद, पुणे

Scanned by CamScanner